शिरोळ पोलीस ठाणे कोल्हापूर

-प्रेस नोट -

---

**शिरोळ पोलीस ठाणे अभीलेखावरील सन 1996 सालच्या गुन्हयातील 24 वर्षापासुन पोलीसांना गुंगारा देणा-या फरारी आरोपीस बीड जिल्हातुन जेरबंद करण्यास शिरोळ गुन्हे शोध पथकास यश**

---

मा.पोलीस अधीक्षक सो कोल्हापुर,मा.अपर पोलीस अधीक्षक सो,गडहिंग्लज विभाग,कार्यालय इचलकरंजी व मा.उपविभागीय पोलीस अधीकारी जयसिंगपुर विभाग,जयसिंगपूर यांनी कोल्हापुर जिल्हयातील पोलीस ठाणे अभीलेखावरील असले पाहीजे- फरारी आरोपी यांची विशेष मोहीम राबवुन आरोपींचा शोध घेवुन अटक करणेबाबत योग्य त्या सुचना व मार्गदर्शन केले होते.

त्याप्रमाणे एस.एस.कुंभार सहायक पोलीस निरीक्षक शिरोळ पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली शिरोळ गुन्हे शोध पथकातील अंमलदार हे पोलीस ठाणे अभीलेखावरील पाहीजे-फरारी आरोपी शोध मोहीम राबवीत असता गुन्हे शोध पथकातील अंमलदार यांना गोपनीय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, शिरोळ पोलीस ठाणे अभीलेखावरील गु.र.नं 116/1996 भा.दं.वि.स.कलम 326,504,34 प्रमाणे सन 1996 सालचा 24 वर्षापासुन पोलीसांना गुंगारा देवुन फरारी असणारा आरोपी नामे आसाराम उर्फ बंडु धोंडीबा माळी हा बीड जिल्हयात वास्तव्यास असलेबाबत खात्रीशीर बातमी मिळालेने **त्याप्रमाणे शिरोळ पोलीस ठाणे गुन्हे शोध पथकातील अंमलदार यांनी विप्रानगर , बीड जिल्हा- बीड येथुन सदर आरोपीस शिताफीने ताब्यात घेवुन त्यास त्याचे नाव व पत्ता विचारले असता त्याने आपले नाव आसाराम उर्फ बंडु धोंडीबा माळी व.व 46 रा.पिंपळगाव कानडा ता.गेवराई जि.बीड येथे राहणेस असल्याबाबत सांगीतले त्यास सदर गुन्हयाचे अनुंशंगाने विचारणा केली असता त्याने आपण सन 1996 साली 24 वर्षापुर्वी दानोळी ता.शिरोळ येथे मोल-मजुरी करीता आलो असता दानोळी गावातील भुपाल उर्फ बबन विठठल माने यांचे सोबत भांडण झाले त्या वादवादीमध्ये त्यांचे डोक्यात व खांदयावर कोयत्याने वार करुन त्याला गंभीर जखमी करुन तेथुन पळुन गेलेचे कबुल केले व गेली 24 वर्षे पोलीस आपल्याला अटक करु नयेत म्हणुन आपण फरार झालेबाबत सांगीतले.सदर आरोपीस गुन्हयाकामी अटक करणेत आलेली आहे.पुढील तपास पोहेकॉ 2/805 सानप हे करीत आहेत.**

**सदरची कारवाई मा.शैलेश बलकवडे पोलीस अधीक्षक सो कोल्हापुर, मा.जयश्री गायकवाड,अप्पर पोलीस अधीक्षक गडहिंग्लज कॅम्प इचलकरंजी, मा.रामेश्वर वैजने उपविभागीय पोलीस अधिकारी जयसिंगपुर विभाग जयसिंगपुर, सहायक पोलीस निरीक्षक शिवानंद कुंभार यांचे मार्गदर्शनाखाली पोसई नवनाथ सुळ, पोहेकॉ ज्ञानेश्वर सानप , पोहेकॉ हणुमंत माळी, पोलीस अंमलदार ताहीर मुल्ला, गजानन कोष्टी या पथकाने केली आहे.**